॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव
Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon
'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)

# जनसंपर्क विभाग

जळगाव दि. १८ (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, सेंटर फॉर इनोव्हेशन, इन्क्युबेशन अ‍ॅण्ड लिंकेजेस (KCIIL) आणि डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम स्किल डेव्हलपमेंट, इनोव्हेशन अ‍ॅण्ड इन्क्युबेशन सेंटर (खान्देश कॉलेज एज्युकेशन सोसायटी संचलित) यांच्यातील सामजंस्य करारावर कुलगुरू प्रा. व्ही. एल. माहेश्वरी यांच्या प्रमुख उपस्थितीत स्वाक्ष-या करण्यात आल्या.

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अनुषंगाने विद्यार्थ्यांनी नवोपक्रम व उद्योग सुरु करण्यासाठी KCIIL च्या माध्यमातून विविध महाविद्यालये व संस्थांमध्ये प्री इन्क्युबेशन सेंटर सुरू व्हावे यासाठी हा सामंजस्य करार करण्यात येत आहे. सोमवार दि. १८ सप्टेंबर रोजी विद्यापीठात डॉ. राजेश जवळेकर, संचालक, नवोप्रक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळ, कबचौ उमवि, जळगाव व खान्देश कॉलेज एज्युकेशन सोसायटी संचलित, डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम स्किल डेव्हलपमेंट, इनोव्हेशन अ‍ॅण्ड इन्क्युबेशन सेंटरच्या वतीने डॉ. योगेश खडके संचालक शैक्षणिक, नवसंशोधन, नवोपक्रम व उद्योजकता यांनी करारावर स्वाक्ष-या केल्या. नवउद्योजकांना प्रोत्साहन व स्टार्टअपला सहकार्य करण्यासाठी या करारामार्फत प्रशिक्षण, आर्थिक सहाय्य तसेच इतर उद्योजकीय सेवा देण्यात येतील. या करारामूळे नवीनता व नवकल्पनांवर आधारित उद्योजकतेची संस्कृती रूजवण्याचा प्रयत्न होणार आहे. शैक्षणिक संस्था, वित्तीय संस्था, उद्योग व इतर संस्था यांच्यात नेटवर्क स्थापन करून स्टार्टअपसाठी प्रभावी इको सिस्टीम तयार करणे, उद्योजकतेसाठीचे नेतृत्व निर्माण करणे आदी प्रमुख उदिष्ट्ये या करारामध्ये नमूद करण्यात आली आहेत.

या करारांप्रसगी संचालिका डॉ. शिल्पा बेंडाळे, आयएमआर कॉलेज, डॉ.डी.जी. हुंडीवाले, संजय पावडे यांच्यासह विद्यापीठाच्या इन्क्युबेशन केंद्राचे संचालक डॉ. भूषण चौधरी, डॉ. विकास गिते, डॉ. समीर पाटील, सागर पाटील, दर्पण साळुंखे आदी उपस्थित होते.

**बातमी नं. २**

जळगाव दि. १८ (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव येथील रसायन तंत्रज्ञान संस्थेक शैक्षणिक वर्ष २०२३-२४ साठी बी.टेक. थेट द्वितीय वर्ष अभियांत्रिकी/ तांत्रिक च्या काही प्रवेशासाठी काही जागा रिक्त आहेत. त्यामुळे इच्छुक विद्यार्थ्यांनी शनिवार दि. २३ सप्टेंबर, २०२३ रोजी दु. १२.०० वाजेपर्यंत संस्थेत अर्ज करण्याची मुदत देण्यात आलेली आहे. सदर रिक्त जागांची माहिती विद्यापीठाचे संकेतस्थळ www.nmu.ac.in वर उपलब्ध आहे. अधिक माहिती संस्थेतील डॉ. पवन डी. मेश्राम (Mob.No. 8087276922) व तुषार डी. देशपांडे, समन्वयक (Mob. No. 89561140966) यांचेशी संपर्क करावा. अशी माहिती संस्थेचे संचालक डॉ. जे.बी. नाईक यांनी कळविले आहे.

---

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२३ दिनांक: १८ सप्टेंबर, २०२३

प्रति,
मा.संपादक/प्रतिनिधी,
महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी करीता